ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महिला सक्षमीकरण–एक वास्तव

**प्रा. कोल्हे तुकाराम त्रिंबकराव**
सहयोगी प्राध्यापक (समाजशास्त्र विभाग)
वि.पा.शि.प्र.म.स. कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कन्नड जि. औरंगाबाद.

★★★

**संकल्पणा** – महिला सक्षमीकरण म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतीके व शैक्षणिक दृष्टया महिला शक्तीमान होणे होय. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या असंभूत क्षमतांचा विधायक विकास होणे होय. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने निर्णय प्रक्रियेत व सामाजिक, राजकिय, आर्थिक व सांस्कृतीक व्यवस्थेत समान स्वरुपाची संधी, स्थान लाभ व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. जननक्षमता, लौगिकता श्रमावर तसेच विचारांवर फक्त् पुरुषांचे वर्चस्व न राहता स्त्रियांना पुरुशांच्या बरोबरीने स्थान मिळणे आवशयक आहे. या सारख्या विचारास महिला सक्षमी करणाचा पाया मानतात. महिला सक्षमीकरण ही एक दिर्घकाळ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रकियेच्या व्दारे महिला सामुहिकपणे विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्यप्रवण राहातात. महिला आर्थीकदृष्टया स्वावलंबी स्वयंनिर्भर होतील तेव्हाचाच सर्व क्षेत्रात आत्विश्वासाने वावरु शकतील. ख–या अर्थाने त्याचे सबलीकरण होईल. स्तरूचे कुटुंब, समाज व राष्ट्राला त्यामुळे पुढे नेहतील. स्वयं सहाययता समुहाचा चळवळीमुळे महिला सक्षपिकरणातील ब–याच प्रमाणात पोषक वातावरण निर्माण झालेले आपणाला दिसून येते. स्वयंसहायता समुहाद्वारे बचत, कर्ज, व्यवसायामार्गाने महिला समाजात स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करतांना स्वतारूच्या विकासाबरोबर आपल्या कुटुंबाच्या आर्थीक आडचणी सोडविण्यास हातभार लावतात तसेच त्या या प्रेरणेतुन राजकारण प्रवेष करतांना दिसतात. श्शासकीय धोरणामुळे त्याचा राजकिय सहभाग वाढला आहे. व ब–याच प्रमाणात महिलांची राजसाता निर्माण झालेली आहे. स्त्रियांच्या आत्मविश्वासात वाढ होतांना आपणास दिसत आहे.

यावरुन ब–याच प्रमाणात सामाजिक दर्जात व स्थानात वाढ होतांना दिसते त्यामुळे सामाजिक व राजकिय दर्जात वाढ झालेली आपणाला दिसून येते. कुटुंबाच्या विकासामध्ये स्त्रियांचे खुप महत्व आहे. प्रत्यक्ष आर्थिक दृश्टीकोणातून तरी स्त्री विकास करीत नसलीतरी इतर बाबतीत कुटुंबातील मुले, पिता यांचा विकास स्त्रीयांमार्फत होत असतो. कुटुंबातील स्त्री जर सबला असेल तर ती आपल्या मुलांचा, कुटुंबाचा विकास खुप चांगल्या प्रकारे करु शकते. जर स्त्रीयांना आर्थीक बाबतीत संधी दिली तर ती योग्य प्रकारे कुटुंब आर्थिक दृ ष्टया सक्षम करु शकते.**व्याख्या** – सबलीकरण ही एक बहुविविध पैलू असलेली बहुस्तरीय आणि प्रवाही सकल्पना आहे. त्यामुळे सबलीकरण किंवा सक्षमीकरणाच्या बाबतीत एकच मत किंवा एकव विधान करता येत नाही. म्हणून वास्तव एकच व्याख्या करता येते नाही. 1) महिला सबलीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची संघतीत करण्याची, मतप्रदर्शन करण्याची कृ तीशील कार्यक्रमाचे आयोजन, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे यास महिला सबलीकरण म्हणतात. 2) अबला महिलांना सबला करण्यासाठी त्यांना समानसंधी देण्यासासाठी विचार मांडणे म्हणजे महिला सबलीकरण होय. 3) सामाजिक व आर्थिक दृष्टया स्त्रियावरील अन्याय व अत्याचार दूर करुन त्यांना न्याय मिळवून देणे म्हणजेच महिला सबलीकरण होय. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्यकीय सुविधा, मालमतेची मालकी, पत पुरवठा प्रषिक्षण आणी रोजगाराच्या बाबतीत पुरुशांच्या तुलनेत राजकिय दृष्टया सक्रीय असलेल्या प्रमाण कमीच दिसून येते. घरगुती हिसांचाऱ्यां बाबतीत जेवढे प्रमाण कार्य होणे आवष्यक आहे, तेवढे होतांना दिसत नाही. स्त्रियांची मानसिकता बदलणे अतिशय महत्वाचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात आतासुध्दा म्हणावे तेवढया प्रमाणात स्त्रिया अजूनही स्वतारू निर्णय घेवू शकत नाहीत. या भागात आणखी देखील त्यांना पुरुषांच्या निर्णयावर आवलंबून राहतात. म्हणून त्यांची निर्णयसक्षता वाढविणे गरजेचे आहे. घटनेने त्यांना जे विविध प्रकारचे अधिकार दिलेले आहेत याची सविस्तर माहिती त्यांच्यापर्यंत पोहविली पाहिजे. त्यांचे योग्य ते प्रबोधन झाले पाहिजे. अजूनही स्त्रि ही 100 टक्के सक्षम आहे हे आपण मान्य करु षकत नाही. ही वस्तुस्थिती आहे हे आपण मान्यच करावे लागेल. स्त्रियांच्या बाबतीत निर्णय स्वतंत्र आपले जीवन कसे व्यतित करायचे, काय श्किायचे, कसे जगायचे, कोणाबरोबर जगायचे, कुठे जगायचे हया बाबतीत सर्वच निर्णय सक्षम स्त्रीला घेता यावेत. तिला भावनिक व शारिरीक स्वातंत्रयाच्या बाबतीत, तिला आपल्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्रय दिल्यास खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण झाले असे आपणास म्हणता येईल.

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपुर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या व्यवस्थीतपणे पार पाडतांना दिसतात म्हणजेच त्या आपली कर्तव्य निभावतना दिसतात असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होतांना दिसते तसेच महिला मोठया प्रमाणात सामाजीक असमानता, अत्याचार, आर्थिक पारंबन्तीबाबत आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात अगदी काळा पासून महिलांवरील ही

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

बंधने त्यांच्या वैयक्तीक आणी व्यावसायीक विकासाच्या आड येत आहेत. महिलांना समाजात सन्मान प्राप्त करुन देण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हींगने समाजातील विविध स्तरावरील महिलांना आत्म सन्मान, अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासात कारणीभूत होती ल असे महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरु केले आहेत. या कार्यक्रमांमुळे महिला आता सर्व समस्यांवर मात करत आपले कौशल्य, आत्मविश्वास आणि उपयोगिताबाबात अग्रेसर होतांना दिसतात. आपल्या कुटुंबामध्ये, इतर महिलासाठी आणि समाजामध्ये शांतीचे आणि सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधीत्व करतांना दिसतात. जीवनात प्रगती आणि सक्षमीकरणासाठी (Mahila sashaktikaran) शिक्षणापेक्षा जास्त परिणामकारक काय असू शकते. आर्ट ऑफ लिविंगने शिक्षणाद्वारे देशातील कान्या कोपरर्‍यातील ग्रामीण मुली आणि महिलांना समान दर्जाने सक्षम बनवले आहे. या वरुन असे सिध्द होते की, स्त्रियांना आत्मनिर्धर व स्वतारुच्या पायावर उभे राहाण्यासाठी षिक्षणाची अत्यंत आवष्यकता दिसून येते त्यामध्ये यांत्रीक, कौषल्य, व्यवसायीक, तांत्रीक शिक्षण चालविणार्‍याला मुलींना व स्त्रियांना भेटल्यास खर्‍या अर्थाने सबलीकरणाची सुरुवात झालेली दिसून येईल. पुर्ण जगात भारत देशाची संस्कृती परंपरा आध्यात्म व भौगोलीक विविधता यामुळे ओळखता जातो. ही नाण्याची एक बाजू झाली पण हाच देश जगभर पुरुषप्रधान संस्कृतीसाठी प्रसिध्द आहे. तस बघितले तर भारतात महिलांना आदर्श शक्तीचे रुप मानूनर पुरातन काळापासून पुजनीय मानले गेलेले आहे. त्याच वेळी याच भारतात महिला घरात आणि समाजामध्ये बंधनामध्ये आडकलेल्या आहेत त्यांना दुययम स्थान दिले जाते. त्यांचे अधिकार व विकास यापासून त्यंना बर्‍यांचप्रमाणात दूर केले जाते. तरीसुध्दा स्त्री पुरुष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. महिलांच्या स्वताच्या व अधिकाराविषयी कळकळ वाटत केली जाते. असे असतांना कोपर्डी किंवा निर्भयाकांड सारख्या घटना घडतांना दिसतात. अशा वेळेस महिलांचे प्रश्न बिकट समस्या म्हणून उभ्या राहतात. त्यावर उपचार म्हणून समाजास महिलांना स्वयत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाने अभियानाची सुरुवात करतो पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. अर्थात पिता, पती आण पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्ट काढते नोकरदार स्त्रीयासुध्दा स्वतरुला पुर्णपणे सक्षम मानत नाहीत. त्यांच्यादृष्टीने कार्यक्रम घटनाचा पुरतेच मर्यादित सबलीकरण आहे. पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करुन वैयक्तीक स्वतंत्रय व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय वैयक्तीक स्वातंत्रय व निर्णय घेण्याचा आधिकार मिळणे होय तरच त्यांना खर्‍या अर्थाने मुक्त स्वातंत्रयाचा लाभ घेता येईल. त्यांना त्यांच्या क्षमताची जाणीव करुन व त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे तेव्हा त्यांना त्यांच्या एकूण अधिकाराची जावीण व माहिती होऊन त्यांचा विकास होण्यास मदत होईल व खर्‍या आर्थाने महिलांचे सबलीकरण होईल असे अभ्यासावरुन वाटते. मानवसमुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांशी दृतोत्साहीत करणारे वर्तन त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्तवाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे. हा भेदभाव दूर करुन स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मीती आणी त्यांचे सुव्यवस्थीत नियोजन करणे आणि लैंगिक समतेद्वारे जेंडर इक्वॉलिटी समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोत केलेली कृती यांचा समुच्च म्हणजे स्त्री सक्षमीकरण, असे थोडक्यात म्हणता येईल. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रीया निर्धन आणी निरक्षर राहण्याचे प्रमाणे मोठे आहे. वैदयकीय सुविधा, मालमत्तेचा मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणी रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पुरुषांच्या तुलनेत राजकीय दृष्टया सक्रीय असण्याची शक्यता फारच कमी आहे आणि त्या घरगुती हिंसाचाराचा बळी होण्याची शक्यता खुपच मोठी आहे. स्त्रियांना मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात अजूनही स्वतरुनिर्णय घेऊ शकत नाहीत. इथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकारी दिलेले आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजी प्रबोधन झाले पाहिजे ती अजूनही 100 टक्के सक्षम आहे हे आपण मान्य करु शकत नाही. म्हणून आणखी समाज व्यवस्था आणि शासन व्यवस्थेने महिला सबलीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

1) महिला सबलीकरणात महिलांच्या आंगभूत क्षमताचा विधायक विकास होतो.
2) स्वयंसहाययता समुह चळवळीमुळे महिला सबलीकरणाला पोषक वातावरण तयार झाले आहे.
3) कुटुंबात प्रामुख्याने आर्थिक दृश्टीने सक्षम करण्यासाठी स्त्रिची भूमिका महत्वाची ठरते.
4) महिला सबलीकरण ही एक अषी प्रक्रिया आहे की, स्त्रियामध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करते.
5) महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी स्वावलंबी व आत्मनिर्भर बनले पाहिजे.
6) वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमताची जानीव करुन वैयक्तीक स्वातंत्रय व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे आवश्यक आहे.

## *संदर्भ ग्रंथ सूची*


1) *स्त्री प्रश्नांची वाटचाल विदयूत भागवत.*
2) *Maharashtra times 1 Oct 2016.*
3) *पाटील शोभा (2007) स्त्रीवादी, विचार आणि समिक्षांचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.*
4) *रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.*
5) *सहयोगी मार्गदर्शक पुस्तीका महिला विकास महामंडळ*